# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:14.08.2025** **वार:गुरुवार**

---

1. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला आज राष्ट्रपतींचं संबोधन
2. लाल किल्ल्यावरील ध्वजारोहण कार्यक्रमात देशभरातील 210 सरपंच सन्माननीय अतिथी
3. गणेशोत्सवात धार्मिक सौहार्दता ठेवत समन्वयानं सण साजरा करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन आणि,
4. क्रीडा महाकुंभचं उद्घाटन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर देशी खेळांच्या मैदानाचं लोकार्पण

**राष्ट्रपती**

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला प्रथेनुसार राष्ट्रपती द्रौपदी मुरमू राष्ट्राला संबोधित करणार आहेत. याचं थेट प्रसारण आज संध्याकाळी 7 वाजता आकाशवाणीच्या आणि दूरदर्शनच्या सर्व केंद्रांवरून केलं जाणार आहे. या संबोधनाचा मराठीतून अनुवाद रात्री साडेनऊ वाजता प्रसारित केला जाईल.

**स्वातंत्र्यदिन**

स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य शासकीय कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर ध्वजारोहण करतील, आणि प्रथेनुसार राष्ट्राला संबोधित करतील. लाल किल्ल्यावर होणाऱ्या कार्यक्रमात सन्माननीय अतिथी म्हणून यावर्षी देशभरातील 210 सरपंचांना आमंत्रित करण्यात आलं आहे. यामध्ये महिला सरपंचांचा लक्षणीय सहभाग आहे. या सरपंचांनी आपल्या गावांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास व्हावा यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत तसंच केंद्र सरकारच्या योजना शंभर टक्के कार्यान्वित करताना स्थानिक गरजांनुसार नवीन उपक्रमही राबवले आहेत. यामध्ये राज्यातल्या 15 सरपंचांचा समावेश असून यात नऊ महिला सरपंच आहेत. या सर्व सरपंचांचा आज दिल्लीत पंचायत राज मंत्रालयाकडून सन्मान करण्यात येणार आहे. या वर्षीच्या या कार्यक्रमाचं घोषवाक्य 'आत्मनिर्भर पंचायत, विकसित भारताची ओळख' अशी असून या वेळी सभासार ॲपचं उद्घाटन करण्यात येणार आहे.

**मांसाहार-मुख्यमंत्री**

स्वातंत्र्य दिनी मांस विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय जुन्या सरकारचाच आहे, असं सांगत यावरून राजकारण करणाऱ्या विरोधकांबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे...

**या राज्य सरकारने असा कुठलाही निर्णय घेतलेला नाही 1988 सालापासून हा निर्णय या ठिकाणी महाराष्ट्रात लागू आहे. शेवटी सरकारला कोणी काय खावं हे ठरवण्यात काही इंटरेस्ट नाही आमच्यासमोर खूप प्रश्न आहेत.**

स्वातंत्र्यदिनी कोणी काय खायचे याचे फतवे काढले जात असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत केला होता, या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री बोलत होते.

**मुख्यमंत्री-गणेशोत्सव**

ऑपरेशन सिंदूरद्वारे भारतानं जगाला दाखवून दिलेली शक्ती आणि स्वदेशी वस्तुंच्या वापराबाबत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी यंदा जनजागृती करावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना केलं आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर काल मुंबईत झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. गणेशोत्सवाला राज्य शासनानं राज्य

महोत्सवाचा दर्जा दिला आहे. सर्वांनी समन्वयानं धार्मिक सौहार्दता ठेवत कुठेही कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असं फडणवीस म्हणाले.

**महिला**

विधान परिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांच्या संकल्पनेतून "महिला सुरक्षितता, सणासुदीच्या काळातील कायदा आणि सुव्यवस्था आणि शहरातील आपत्ती व्यवस्थापन" या विषयांवर विशेष कार्यशाळेचं आयोजन काल मुंबईत करण्यात आलं. या कार्यशाळेत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विशेष मार्गदर्शन केलं. मुंबई पोलीस, मुंबई महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि महिला दक्षता समित्यांनी यामध्ये सहभाग घेतला. महिलांची जोखीम ओळखण्याची क्षमता समाजसुरक्षिततेसाठी महत्त्वाची असल्याचं मत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केलं तर गणेशोत्सव काळात महिलांच्या सुरक्षिततेसाठी दक्षता समित्यांनी सज्ज राहावं अशा सूचना उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी दिल्या.

**गोवा महामार्ग-सिंधुदुर्ग**

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल सिंधुदुर्गमध्ये विविध विकास कामांचा आढावा घेतला. मुंबई गोवा महामार्गाचं काम युद्ध पातळीवर सुरु असून येत्या तीन महिन्यात हा महामार्ग पूर्ण होईल अशी ग्वाही केंद्रीय मंत्री नीतीन गडकरी यांनी दिल्याची माहिती बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या लाखो गणेशभक्तांची गैरसोय टाळण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल एका बैठकीत ठोस उपाय करण्याचे निर्देश दिले. कोलाड ते माणगांव दरम्यान सर्व बाह्यवळण मार्गांसाठी 21 कोटी 90 लाख रूपयांची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जनआक्रोश समितीनं पळस्पे फाट्यावर आंदोलन सुरू केलं होतं. याची दखल पवार यांनी घेतली. या महामार्गावरील खड्ड्यांबाबत प्रवाशांच्या तक्रारी नोंदवून घेण्यासाठी हेल्पलाईन निर्माण करून तक्रार येताक्षणीच पुढील 24 तासात कार्यवाही करण्याचे आदेश पवार यांनी दिले.

**हर घर तिरंगा**

घरोघरी तिरंगा हे अभियान देशभरात राबवण्यात येत आहे. त्याची उद्या सांगता होईल. राज्यातही या निमित्तानं विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. त्याविषयीचा वृत्तान्त...

**हर घर तिरंगा अभियानाचा एक भाग म्हणून नागरिकांना भारताचा 79 व्या स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी 13 ते 15 ऑगस्ट दरम्यान घरांवर आणि आस्थापनांवर राष्ट्रध्वज फडकवण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आलं असून नागरिकांनी याला मोठा प्रतिसाद दिला आहे. हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत काल जिल्हयाजिल्ह्यातून तिरंगा यात्रा काढण्यात आल्या. तिरंगा विक्री आणि वितरण मोठ्या प्रमाणावर केलं जात असून शाळांमध्ये विशेष सजावट, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व, निबंध स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं. आळंदी तसंच इंदापूर मध्ये शहरात नगरपरिषदेच्या शाळांमधून हर घर स्वच्छता, पर्यावरण संवर्धन याविषयी स्पर्धा घेण्यात आल्या आणि जागृती करण्यात आली. तसंच वृक्ष लागवड करण्यात आली. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ला इथं स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आलं. पालघरमध्येही माजी सैनिकांचा सत्कार आणि सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. रत्नागिरी पोलीस दलातर्फे पाच किलोमीटर अंतराच्या 'अमली पदार्थमुक्त रत्नागिरी दौड'चे आयोजन करण्यात आले होते. पिंपरी चिंचवड महापालिका आरोग्य विभागाकडून 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत महापालिका 'हर घर तिरंगा-हर घर स्वच्छता' या विशेष मोहिमेच्या माध्यमातून शहरात देशप्रेम आणि स्वच्छतेची जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. यामध्ये काल एका पथनाट्याचं आयोजन करण्यात आलं होतं. 'हर घर तिरंगा' अर्थात 'घरोघरी तिरंगा' अभियान आता लोकचळवळ बनली असून या अभियानात महाराष्ट्र राज्यानं लक्षवेधी कामगिरी केलेली आहे. याचच प्रतिबिंब सर्व राज्यात केल्या जात असलेल्या उपक्रमांमधून दिसत आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठीकठिकाणच्या वार्ताहरांसह मेघना देशपांडे पुणे.**

**क्रीडा-महाकुंभ**

पारंपरिक देशी खेळाडूंना पुरस्कार, शासकीय लाभ आणि नियुक्त्यांबाबत शासन स्तरावर प्रयत्न करणार असल्याचं आश्वासन क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांनी काल कुर्ला इथं दिलं. ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव पारंपरिक देशी क्रीडा महाकुंभच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर देशी खेळांच्या मैदानाचं लोकार्पणही यावेळी करण्यात आलं. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त या क्रीडामहाकुंभाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी लाठीकाठी, मल्लखांब आणि तलवारबाजी या साहसी खेळांची प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली. क्रीडा महाकुंभ 22 ऑगस्टपर्यंत होणार असून सुमारे 20 हजार स्पर्धक 18 विविध देशी खेळांसाठी मैदानात उतरतील.

**गोविंदा-पालघर**

दहीहंडी उत्सवात भाग घेणाऱ्या गोविंदा पथकातल्या गोविंदांच्या सुरक्षेच्या दृष्टीनं वसई विरार शहर महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाकडून शहरातल्या 99 गोविंदा पथकांतल्या सहा हजारांहून अधिक गोविंदांचा विमा काढण्यात आला आहे. गोविंदांच्या सुरक्षिततेची संपूर्ण काळजी घेण्याचं आवाहन महापालिकेनं मंडळांना केलं आहे.

**संस्कृत**

रक्षाबंधन अर्थात नारळी पौर्णिमा हा दिवस देशभर संस्कृत दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त संस्कृत प्रसार आणि प्रशिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या पुण्यातील 50 पेक्षा जास्त नामवंत, अग्रगण्य संस्थांच्या वतीनं 'संयुक्त संस्कृत दिन' कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. अनेक अर्थांनी सध्या संस्कृतला अनुकूल असा काळ आहे. नव्या शैक्षणिक धोरणाचा मुख्य आशय शिक्षणातून भारताचा परिचय घडावा, असा आहे. ते शिक्षण प्रामुख्यानं संस्कृतमध्ये आहे. समाजात संस्कृत पुन्हा सुप्रतिष्ठित व्हावी, यासाठी एकत्रित प्रयत्नांची ही एक सुरवात आहे असे विचार संस्कृत भारतीचे अखिल भारतीय भगवद्गीता शिक्षण प्रमुख शिरीष भेडसगावकर यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

**आयात-शुल्क**

अमेरिकेनं लादलेल्या आयात शुल्काचा भारतीय निर्यातीवर होणारा परिणाम अल्पकाळ असेल आणि तो एक किंवा दोन तिमाहीत कमी होईल असं मुख्य आर्थिक सल्लागार व्ही अनंत नागेश्वरन यांनी काल मुंबईत सांगितलं. रत्नं आणि दागिने तसंच मासेमारी क्षेत्रातील कोळंबी व्यापार आणि कापड यासारख्या क्षेत्रांना सुरुवातीचा फटका बसत आहे, परंतु अर्थव्यवस्थेवर दीर्घकालीन परिणाम मर्यादित असेल. व्यवसायिकांनी धीर धरावा असं आवाहन त्यांनी केलं.

**पाऊस**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात पडणाऱ्या पावसामुळं हिप्परगा तलाव भरून वाहू लागला आहे. त्यामुळे शहरात अनेक ठिकाणी पावसाचं पाणी शिरलं आहे. ग्रामीण भागातही शेतात पाणी साचलं असून उभी पिकं धोक्यात आली आहेत.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. राज्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**